महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

**पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका,**
**नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर**

**दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११**
**Email ID : collectorpalghar@gmail.com**

---

## वाचले:-

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.
४) मा.सचिव (गृह), गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील अधिसुचना क्र.४०-३/२०२०-डीएम-आय (ए) दि.२४/०३/२०२०.
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक - No:DMU/ २०२०/ CR.९२/DisM-१/दि.२३.०३.२०२०, दि.२४.३.२०२० व दि.२५.३.२०२०.
६) या कार्यालयाचे आदेश क्र/जि.आ.व्य.पालघर/का.वि./प्रतिबंधात्मक आदेश/कावि-३६५/२० दि.३१/०३/२०२०
७) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.१७/२० दि.३१/०३/२०२०.
८) पोलीस अधीक्षक पालघर यांचेकडील आदेश क्र/जिविशा/टे.९/कोरोना विषाणू/भा.मं.बंद/२०२०-१९९७ दि.०५/०४/२०२०.

---

क्र/जि.आ.व्य.पालघर/का.वि./व.वि.शम./भाजीपालाबंद/आदेश/कावि- ४२४ /२० दि.०५/०४/२०२०

## आ दे श

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.३ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली असून शासन अधिसूचनेच्या नियम १० नुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपोद्घातातील अ.क्र.४ व ५ च्या अधिसुचनेद्वारे राज्यामध्ये लॉकडाऊन परिस्थिती लागू करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.८ अन्वये पोलीस अधीक्षक पालघर यांनी या कार्यालयाकडील आदेशान्वये जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करण्यासाठी बाहेर जाण्याची सुट आहे. त्यानुसार वसई विरार महानगरपालिका क्षेत्रामध्ये सर्व लोक भाजी मंडईमध्ये खुप मोठया प्रमाणात सकाळ संध्याकाळ येत असल्याने व अपेक्षित social distancing पाळत नसून, संचारबंदी आदेशाचा भंग करीत आहेत. याबाबत त्यांचेवर कायदेशीर कारवाई करुनही लोकांच्या वर्तनात फरक पडलेला नाही. सबब नमुद परीसरात कोव्हीड-१९ चा मोठया प्रमाणावर प्रसार होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील भाजी मंडई ४ दिवस बंद ठेवणेकामी विनंती केली आहे.

त्याअर्थी मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व उपोद्घातातील अ.क्र.३ मधील शासन अधिसूचनेनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० मधील निर्देशान्वये पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी

उपोद्घातातील अ.क्र.३ मधील महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० चा नियम १०(ए) नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पालघर जिल्हयातील वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील लोक एकाचवेळी भाजीपाला न घेता भाजीपाला घेण्याच्या निमित्ताने मोठया प्रमाणावर घराबाहेर पडून संचारबंदी आदेशाचा भंग करीत असल्याने कोव्हीड-१९ चा प्रसार होऊ नये, या करीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रा मधील **भाजीपाला बाजार व सर्व भाजीपाला दुकाने सोमवार दि.०६/०४/२०२० ते गुरुवार दि.०९/०४/२०२० पर्यंत ४ दिवस बंद** ठेवण्याचे आदेश देत आहे.

उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१ (b), भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ व भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश आज दि. ०५/०४/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
**(डॉ.कैलास बा.शिंदे)**
**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत:-**

१) सर्व संबंधित.
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार कॉम्प्लेक्स बिल्डींग, नवीन मंत्रालय, मुंबई-४००००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) उपविभागीय अधिकारी वसई यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) तहसीलदार वसई यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी पालघर

**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**